आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ एप्रिल २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर, वक्फ बोर्डावर बिगर मुस्लिम सदस्यांची नेमणूक करणार नसल्याचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा निर्वाळा

- वक्फ सुधारणा विधेयक संविधान विरोधी असल्याचा विरोधी पक्षांचा आरोप, वक्फ मालमत्तांचा फायदा गरीब मुस्लिमांना व्हावा यासाठी हे विधेयक असल्याचं सरकारचं स्पष्टीकरण
- गेल्या आर्थिक वर्षात देशात साडे ५ हजार किलोमीटरहून अधिक रेल्वे मार्गांची निर्मिती, सुमारे १७०० रेल्वे इंजिनांचं उत्पादन

  **आणि**
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या थायलंड आणि श्रीलंका दौऱ्यावर रवाना होणार

**<><><><><>**

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक सादर केलं. या विधेयकाचं उद्दिष्ट वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि प्रशासन यात सुधारणा करणं हे आहे. हे विधेयक केवळ मालमत्ता व्यवस्थापनाशी निगडित असून सरकार कोणत्याही धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करणार नाही, असं ते म्हणाले. या विधेयकावर कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात संयुक्त संसदीय समितीत चर्चा झाली आहे. विधेयकाला विरोध करणारे देखील त्यातल्या सुधारणांचा अभ्यास केल्यानंतर त्याचं स्वागत करतील, असं ते म्हणाले.

वक्फ बोर्डांमध्ये शिया, सुन्नी, बोहरा तसंच मुस्लिम समाजातल्या मागास जमातींचे प्रतिनिधी आणि महिलांचा देखील समावेश असेल. विधेयकाला धर्म आणि

जातीच्या कक्षेतून न पाहता त्याकडे मुस्लिम समाजातल्या गरिबांच्या कल्याणाच्या दृष्टीनं बघावं. देशात पडून असलेल्या वक्फ मालमत्तांचा उपयोग गरीब मुस्लिमांसाठी करता येईल, असं ते म्हणाले. संपूर्ण जगातल्या वक्फ मालमत्तेपैकी सर्वाधिक मालमत्ता भारतातल्या वक्फ मंडळांच्या ताब्यात आहे, मात्र असं असूनही आजपर्यंत मुस्लिम समाजातले गरीब लोक शिक्षण, वैद्यकीय सुविधा, रोजगार यांपासून का वंचित राहिले, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**<><><><><>**

वक्फ मालमत्ता व्यवस्थापनात असलेला पारदर्शकतेचा अभाव या नव्या कायद्यामुळे दूर होणार आहे. विधेयकातल्या या आणि इतर तरतुदींविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड व्हाइस कास्ट***

*वक्फच्या नोंदींचं डिजिटायजेशन करणं, वक्फ मालमत्तांचं ऑडिट करणं, मालमत्तेचं सर्वेक्षण पूर्ण करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. नव्या सुधारणेनुसार वक्फ बोर्डात मुस्लिम समुदायातल्या मागास घटकांना आणि महिलांना प्रतिनिधीत्व दिलं जाईल. या विधेयकामुळे वक्फच्या मालमत्तेवर शैक्षणिक संस्था, शॉपिंग सेंटर, निवासी इमारत उभारण्याचा अधिकार वक्फ बोर्डाला मिळणार आहे.*

*संयुक्त समितीने वक्फ दुरुस्ती विधेयकात काही महत्वाच्या सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार मुस्लिम समुदायाने स्थापन केलेल्या कोणत्याही ट्रस्टला आता वक्फचा दर्जा दिला जाणार नाही. केंद्रीकृत पोर्टलद्वारे वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन केलं जाईल. केवळ मुस्लिम धर्मीय व्यक्तीलाच आपली मालमत्ता वक्फ बोर्डाला देता येईल. मुतवल्ली अर्थात वक्फच्या विश्वस्ताला मालमत्तेचे तपशील सहा महिन्यांच्या आत केंद्रीय पोर्टलवर नोंदवावे लागणार आहेत. तसंच वार्षिक एक लाख उत्पन्न असलेल्या वक्फ बोर्डाला सरकार नियुक्त लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षण करून घ्यावे लागणार आहे.*

**<><><><><>**

लोकसभेत या विधेयकावर सविस्तर चर्चा सुरू आहे. विविध पक्षाच्या खासदारांनी यात सहभाग नोंदवला. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

वक्फ सुधारणा विधेयक, संविधान विरोधी असून सरकार त्यावरून जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी लोकसभेत यावरच्या चर्चेला सुरुवात करताना केला. हे विधेयक आणून संविधान कमकुवत करण्याचा, अल्पसंख्याक समाजाला बदनाम करण्याचा आणि भारतीय समाजात दुफळी माजवण्याचा सरकारचा डाव आहे, अशी टीका त्यांनी केली. या विधेयकातल्या सुधारणांमुळे आणखी समस्या निर्माण होतील, असं ते म्हणाले.

केंद्र सरकारनं बेरोजगारी, महागाई, नोटाबंदी आणि इतर आघाड्यांवर आलेलं अपयश झाकण्यासाठी हे विधेयक आणलं आहे अशी टीका समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी केली. या विधेयकामुळे देशाची धर्मनिरपेक्ष प्रतिमा डागाळेल, असं ते म्हणाले.

तर हे विधेयक अयोग्य, तर्कहीन आणि मनमानी असल्याची टीका तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी केली. मुस्लिम समाजाचे अधिकार कमी करण्याचा सरकारचा उद्देश आहे, असं ते म्हणाले.

भाजपाच्या रविशंकर प्रसाद यांनी या आरोपांचं खंडन केलं. भारत हा देश जितका हिंदूंचा आहे, तितकाच मुस्लिमांचा आहे. विरोधक या चर्चेदरम्यान संविधानातल्या निवडक भागाचा दाखला देत आहेत. मात्र वक्फ मालमत्तेचं आणि वंचितांच्या हक्काचं रक्षण करण्याच्या सरकारच्या कार्याला संविधानानंच पाठिंबा दिला आहे, असं त्यांनी सांगितलं.

संयुक्त संसदीय समितीमध्ये प्रत्येक कलमांवर चर्चा झाली नाही असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी यावेळी केला. बिहारच्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकार हा काथ्याकूट करत आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

तर या विधेयकामुळे मागासलेल्या मुस्लिम समाजाला निश्चितच एक नवी विकासात्मक दिशा मिळेल असा विश्वास शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी व्यक्त केला. अरविंद सावंत यांच्या भाषणातून बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा दिसत नसल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

वक्फ बोर्डावर एकही बिगर मुस्लिम सदस्याची नियुक्ती करणार नसल्याचा निर्वाळा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकसभेत दिला.

**होल्ड - अमित शहा**

मुस्लिमांची धार्मिक वागणूक आणि त्यांनी दान केलेल्या संपत्तीमध्ये हे विधेयक कुठल्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही. अल्पसंख्यक मतदारांमध्ये भिती निर्माण करण्यासाठी गैरसमज पसरवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतील धर्मनिरपेक्षता वक्फ सुधारणा विधेयकातून प्रतिबिंबित होत असल्याचं प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. वक्फ सुधारणा विधेयक हे कोणत्याही धर्माच्या विरोधात किंवा कोणाच्याही आस्थेला ठेस पोहचव णारे नाही. त्यामुळे ज्यांची सद्सद्विवेकबुद्धी जिवंत आहे अशी प्रत्येक व्यक्ती या सुधारणा विधेयकाला पाठिंबा दर्शवेल असं ते म्हणाले. जुन्या कायद्यात वक्फ बोर्डाला अमर्याद अधिकार होते. चुकीच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्याची मुभा नव्हती. हे सुधारणा विधेयक जुन्या

चुका दुरुस्त करण्याची संधी देईल, असं ते म्हणाले. यापूर्वीच्या कायद्यामुळे गावेच्या गावे किंवा अनेकांच्या जमिनी वक्फमध्ये दाखवून त्या लाटल्या जात होत्या. जमिनी काढण्याचे हे प्रकार सुधारणा विधेयकामुळे थांबणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या विधेयकाचं स्वागत केलं आहे. काही मुठभर लोकांच्या हातात वक्फ बोर्डाची मालमत्ता ठेवण्यापेक्षा गरीब मुसलमानांसाठी शाळा, रुग्णालये उभारणं गरजेचं आहे. या विधेयकामुळे मुस्लिम समाजाचा सर्वांगीण विकासाचा मार्ग खुला होईल, असं ते म्हणाले. निवडणुकीत मुस्लिम मतांसाठी राजकारण करणाऱ्यांचे खरे चेहरे आज या विधेयकाच्या निमित्ताने समोर आले, अशी टीका त्यांनी विरोधकांवर केली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या विधेयकावर टीका केली आहे. भाजपा सरकार वक्फ विधेयकाकडे धार्मिक नजरेने पाहून ती जमीन ताब्यात घेऊन उद्योगपती आणि बिल्डरांच्या घशात घालण्याचा प्रयत्न करत आहे का? असा सवाल त्यांनी केला.

<><><><><>

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५ हजार ६०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची निर्मिती केली असून ५ हजार १५० किलोमीटरचं उद्दिष्ट पूर्ण केलं आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती दिली आहे.

<><><><><>

आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत भारतीय रेल्वेनं १ हजार ६८१ रेल्वे इंजिनांची निर्मिती केली आणि याबाबतीत अमेरिका आणि युरोपला मागे टाकल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं एका पत्रकात दिली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही संख्या १९ टक्क्यांनी वाढलेली आहे.

<><><><><>

सहाव्या बिमस्टेक शिखरपरिषदेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी थायलंडला रवाना होतील. या दौऱ्यात ते प्रधानमंत्री पिटाँग-टार्न शिनवात्रा यांच्याशी द्विपक्षीय संबंध बळकट करण्यावर बँकॉकमध्ये चर्चा करतील. थायलंडचे राजे दहावे राम आणि राणीसोबतही मोदी यांची भेट होण्याची शक्यता आहे.

हा दौरा आटोपून प्रधानमंत्री श्रीलंकेला जाणार आहेत. यावेळी श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमार दिसनायके यांच्याशी चर्चा करतील.

<><><><><>

वेव्हज २०२५ साठी भारताने चिली या देशाला आमंत्रित केलं आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी काल नवी दिल्लीत चिलीच्या संस्कृती, कला आणि वारसा मंत्री कॅरोलीना अर्रेडोंडो यांची भेट घेतली आणि त्यांना वेव्हज परिषदेचं आमंत्रण दिलं.

<><><><><>

कोल्हापूर जिल्ह्यात पट्टणकोडोली इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा परवानगी न घेता उभारल्यावरुन प्रशासन आणि पुतळा समर्थकांमधे निर्माण झालेला तणाव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीमुळे निवळला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांचा सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या ७ षटकात ४ बाद ४८ धावा झाल्या होत्या.